# आजपासून रंगणार 'मटा'ची पुस्तक मैफल!

## प्रकाशक व विक्रेत्यांकडून घसघशीत ५० टक्क्यांपर्यंत सवलत




**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

मराठी दिनाला मराठी पुस्तकांचे, वाचनाचे आणि वाचन संस्कृतीचे कोंदण आवश्यक ठरते. म्हणूनच 'महाराष्ट्र टाइम्स'च्या या बातमीचे कात्रण घेऊन गेल्यास पुण्यातील प्रमुख पुस्तक विक्रेते व प्रकाशकांनी २० ते २५ टक्के सवलत देऊ केली आहे. आज, म्हणजे शुक्रवार ते रविवार (दि. २७ ते १ मार्च) असे तीन दिवस ही सवलत मिळणार आहे.

ज्ञानेश्वर, तुकारामांपासून आजच्या पिढीपर्यंत साहित्याचा प्रवाह कायम वाहता राहिला आहे. त्यामध्ये प्रमुख भूमिका असते ती वाचकांची. प्रसिद्ध लेखकांबरोबर आजच्या पिढीतील लेखकांचे साहित्य वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी या तीन दिवसांसाठीची ही सवलत उपयुक्त ठरणार आहे. अधिकाधिक वाचकांपर्यंत अधिकाधिक पुस्तके पोहोचावीत, त्यातून नवे लेखन, नवे विषय चर्चेस यावेत, वाचन संस्कृतीचा अधिकाधिक प्रसार व्हावा, हा या योजनेमागचा उद्देश आहे. 'पुरंदरे प्रकाशन' मीना प्रभू यांच्या पुस्तकांचा ४,६०० रुपये किमतीचा संपूर्ण संच या तीन दिवसांत १,६०० रुपयांत देणार आहे. त्यांच्या इतर पुस्तकांवर २५ टक्के सवलतही आहे. अभ्यासकांमध्ये अधिक परिचित असलेली, इतिहास, वर्तमानाचा आढावा घेणारी 'युनिक ॲकॅडमी'ची पुस्तके थेट ५० टक्के किमतीत मिळणार आहेत. 'उत्कर्ष बुक डेपो'ने एक हजार रुपयांची पुस्तके घ्या आणि एक पिशवीभर पुस्तके मोफत मिळवा, ही खास योजना या तीन दिवसांसाठी जाहीर केली आहे. बुकगंगा डॉट कॉम (BookGanga.com) या साइटवरही ही सवलत लागू राहणार आहे. 'अमेय प्रकाशन'च्या नातूबाग (बाजीराव रस्ता) येथील विक्री केंद्रावर २० ते २५ टक्के सवलत असेल. 'अक्षरधारा बुक गॅलरी'त काही लेखकांचे संपूर्ण संच खरेदी केल्यास २५ टक्के, तर इतर पुस्तकांवर २० टक्के सवलत मिळेल. 'नितीन प्रकाशन'मध्ये २० ते २६ टक्के, तर शब्दांगण व रसिक साहित्य या ठिकाणी २० टक्के सवलत जाहीर करण्यात आली आहे. रोहन प्रकाशनच्या वेबसाइटवर MATARPMYMB हा कोड दिल्यास २५ टक्के सवलत मिळेल. पद्मगंधा प्रकाशन, मनोविकास प्रकाशन आणि डायमंड पब्लिकेशन्सनेही २५ सवलत जाहीर केली आहे. लहान मुलांच्या पुस्तकांसाठी प्रसिद्ध असलेल्या 'ज्योत्स्ना प्रकाशन'मध्ये २० टक्के सवलत मिळेल. डहाणूकर कॉलनीतील 'समुत्कर्ष बुक्स'मध्ये २० टक्के सवलत आहे.

### येथे मिळेल विशेष सवलत

अक्षरधारा बुक गॅलरी (बाजीराव रस्ता) , शब्दांगण (साहित्य परिषद इमारत), रसिक साहित्य (आप्पा बळवंत चौक), रोहन प्रकाशन (शनिवार पेठ, पोलिस चौकीसमोर), बुकगंगा डॉट कॉम, काँटिनेंटल (ना. सी. फडके सभागृहाजवळ), उत्कर्ष बुक डेपो (डेक्कन), नितीन प्रकाशन (आप्पा बळवंत चौक), अमेय प्रकाशन (नातूबाग), मनोविकास प्रकाशन (नूमविसमोर), पुरंदरे प्रकाशन (पेरुगेटशेजारी), युनिक ॲकॅडमी (फर्ग्युसन कॉलेजसमोरील रस्ता), पद्मगंधा प्रकाशन (माडीवाले कॉलनी) डायमंड पब्लिकेशन्स (ओंकारेश्वर मंदिराजवळ), ज्योत्स्ना प्रकाशन (शनिवार पेठ), समुत्कर्ष बुक्स (डहाणूकर कॉलनी)